# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६, फॅक्स क्रं.:- ०७१२-२५६१६६३

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in


परीपत्रक

क्रमांकः-तंशिस/विकाना/वृक्षलागवड/2018/ 3213

दिनांक - 3 OCT 2018

प्रति,

प्राचार्य/संचालक,

सर्व शासकीय,अनुदानित व खाजगी विना अनुदानित

व कायम विनाअनुदानित पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,

नागपूर जिल्हा.

**विषयः- 50 कोटी वृक्षलागवड कसर्यक्रमांतर्गतसन 2019 या वर्षामध्ये एकुण 33 कोटी वृक्ष लागवडीचे कार्यक्रमांतर्गत यंत्रणानिहाय उदीष्ट वाटपाबाबत.**

उपरोक्त विषयांन्वये आपणांस कळविण्यांत येते की, वनविभागाकडुन 50 कोटी वृक्षलागवड कार्यक्रमांतअंतर्गत सन 2019 या वर्षामध्ये 33 कोटी वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट प्राप्त झालेले आहे. त्याअनुषंगाने व तंत्र शिक्षण विभांगांतर्गत येत असलेल्या संस्थांना एकुण 73200 वृक्ष लागवड करण्यांचे ठरविण्यात आलेले आहे. त्यानुसार सन 2019 या वर्षामध्ये वृक्षलागवड कार्यक्रमांत जास्तीत जास्त प्रमाणांत सहभागी होण्यासाठी या विभांगाच्या अधिपत्याखाली येत असलेल्या संस्थांनी खालील प्रमाणे संस्थांस्तरांवर पूर्व नियोजन व पूर्वतयारी आणि इतर बाबीसंदर्भांत कार्यवाही करण्यांत यावी जेणे करुन वृक्षलागवडीचे उद्दीष्ट पूर्ण करता येईल.

1. सन 2019 मध्ये दिलेल्या उद्दिष्टयांप्रमाणे प्रत्येक संस्थेत, महाविद्याल्यात 100 वृक्ष लागवड करण्यांचे ठरविण्यांत आलेले असुन. प्रत्येक संस्थेने, संस्थेच्या परीसरात दिलेल्या उद्दिष्टयांप्रमाणे जास्तीत जास्त झाडे लावावी. त्यासाठी माती,खत व किटकनाशके घालून वृक्ष लागवडीपूर्वी किमान 3 महिने आधी दि. 31 मार्च 2019 पर्यंत खड्डे तयार करणे.संस्था, महाविद्यालयाच्या परीसरात किंवा आजुबाजूला असणा-या मोकळया व पडीक जमिनीचा वापरमोठया प्रमाणात वृक्ष् लागवड करण्यांसाठी करण्यांत यावे.
2. महाविद्यालय,संस्थेतील अधिकारी/कर्मचारी/विद्यार्थी यांना शासनांच्या वनविभागांमार्फत निर्माण करण्यांत आलेल्या mahaforest.nic.in वेबसाईड वर Green Army Registration करून वृक्ष लागवड कार्यक्रमांत मोठया प्रमाणात सहभागी होण्यास प्रोत्साहित करण्यांत यावे. महाविद्यालय,संस्थेमध्ये आपत्ती व्यवस्थापनासाठी जसा विद्यार्थ्यांकडुन निधी संकलित केला जातो, त्याच धर्तीवर वृक्षलागवड आणि संगोपनासाठी संस्था, महाविद्यालय यांनी प्रत्येक विद्यार्थ्यांकडुन प्रत्येकी किमान रू. 2 प्रमाणे दरवर्षी जमा करून विद्यार्थ्यांकडुन एकत्रित उपलब्ध होणारा निधी कायमस्वरूपी वृक्षांच्या संगोपनासाठी वापरण्यांत येईल. अशा योजना/निर्णय आपल्या स्तरावर घेण्यांत यावा.

तसेच सन 2018 मध्ये करण्यांत आलेल्या वृक्षलागवड कार्यक्रमाअंतर्गत जिवंत असलेल्या झाडांची आपल्या संस्थेची माहिती दिलेल्या विवरण पत्रात भरून त्वरीत या कार्यालयास पाठवावे. जेणे करून उपवनसंरक्षक, नागपूर वनविभाग, नागपूर,यांना पाठविणे शक्य होईल.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | सन 2018 मध्ये लावण्यांत आलेल्या झाडांची संख्या. | सन 2018 मध्ये जिवंत असलेल्या झाडांची संख्या | टक्केवारी | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

(गुलाबराव ठाकरे)

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

नागपूर.

E/MRS. SAPNA KOWE/TREE PLANTATION COVERING LETTER 2017-18